# वर्गबंधुच



जे पाहिले तूं, . . . ते पाहिले मीही तारे
अरे मी तुझा वर्गबंधुच नारे?

प्रथम तूं क्रमांकी, गणितात गुणाकारी
आम्हास वजाबाकी, उरते सदा अखेरी
इतिहास हाच माझा, वांच्छित मी भिकारी
तव स्वप्नधूरवलयी मी रेखाटले मनोरे
अरे मी तुझा वर्गबंधुच नारे?

हुंगतोस तूं सुगंधा, मी झीज चंदनाची
तूं पाखरू फुलांचे, मी रात्र वाघुळाची
तूं पूर्त अपेक्षांचा, मज भ्रांत रे उद्याची
तव उष्ण उबेखातर, जाळिले मी निखारे
अरे मी तुझा वर्गबंधुच नारे?

तुझी शुद्ध गंगा जरी वाहताहे
आटल्या सागराला मी पेट लावलाहे
भंगल्या मनाचा मी व्यक्त राग आहे
जे पाहिले तूं . . . पाहिले मीही तारे
अरे मी तुझा वर्गबंधुच नारे?